**वि.दि.दावा क्र.२५/२०१९**
**जगदीश व १ वि. मनोहर व ४**
**MHCH020005562019**

# <u>आदेश निशाणी ८५ वर</u>

(पारीत दिनांक २९/०४/२०२५)

प्रतिवादी क्र.०३ यांनी सदरचा अर्ज वादी क्र.०१ विरुध्द प्रतिदावा सी.पी.सी.चे आदेश ०८, नियम ६अ प्रमाणे लेखी बयाणात दुरुस्ती करुन प्रतिदावा दाखल करण्याची परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र.०३ यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तूतच्या दाव्यात वादी क्र.०१ ने त्यांचा सरतपास दाखल केला आहे परंतू अजूनपावेतो त्यांची उलटतपासणी सुरु झालेली नाही. मागील आठ दिवसांपासून वादी क्र.०१ हे त्यांच्या प्रतिदाव्यातील शेतजमीनीवरील त्यांचे कब्जास व वहीवाटीस अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामूळे त्यांना प्रतिदावा दाखल करणे आवश्यक झाले आहे. वादी क्र.०१ यांची उलटतपासणी सुरु झाल्यानंतर कायद्यान्वये त्यांना सदरचा प्रतिदावा दाव्यात दाखल करता येणार नाही. प्रस्तूत दाव्याच्या योग्य निकालाकरीता त्यांना सदरचा प्रतिदावा दाखल करणे आवश्यक आहे. करीता त्यांना त्यांच्या लेखी बयाणातील परिच्छेद क्र.२८ नंतर परिच्छेद क्र.२८अ ते २८ई हे परिच्छेद जोडून लेखी बयाणामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. करीता सदरचा अर्ज.

०३. वादी यांनी सदर अर्जाला प्रखर विरोध करुन कथन केले की, प्रतिवादी क्र.०३ यांनी प्रस्तावित केलेली दुरुस्ती ही अनुषंगीक दुरुस्ती नसून पूर्ण नवीन बाब न्यायालयासमक्ष आणण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. प्रस्तूतच्या दाव्यात पूर्वीच पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले असून पुरावा सुरु झाल्यानंतर आजपर्यंत प्रतिवादी क्र.०३ ने दुरुस्ती का केली नाही ही बाब त्यांनी न्यायालयासमक्ष आणलेली नाही. करीता प्रतिवादी क्र.०३ चा सदर अर्ज हा गुणवत्ताहिन असून तो खारीज करण्याची त्यांनी विनंती केली आहे.

०४.	वादी व प्रतिवादी क्र.०३ यांचे कथन व जवाब ऐकल्यानंतर असे स्पष्ट होते की, सदरचा दावा हा घोषणेकरीता व कायमच्या मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.०३ यांना त्यांच्या लेखी बयाणात परिच्छेद क्र.२८ नंतर "परिच्छेद क्र.२८अ ते २८ई'' हे परिच्छेद जोडून दुरुस्ती करावयाची आहे. प्रस्तुत प्रस्तावित दुरुस्तीला वादी यांनी विरोध केलेला असून प्रतिवादी क्र.०३ हे त्यांच्या लेखी बयाणात परिच्छेद क्र.२८ नंतर परिच्छेद क्र.२८अ ते २८ई जोडू इच्छीत आहे. सदर मजकूराच्या बाबी सिध्द करण्याची जबाबदारी ही प्रतिवादी क्र.०३ यांचेवर आहे. त्यामुळे सदरची दुरुस्ती केल्यास वादीचे काहीएक नुकसान होणार नाही. करीता नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने सदरची दुरुस्ती करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे. म्हणून खालील प्रमाणे आदेश–

## <u>आदेश</u>

१. निशाणी ८५ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.०३ यांनी प्रस्तूतची दुरुस्ती विहीत मुदतीत करुन घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by NAJIMODDIN PATHAN
Date: 2025.04.29 17:53:32 +0530

(एन. ए. पठाण)
५वे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)
चंद्रपूर.

दि.२९/०४/२०२५